# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/06/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## खुन

पो.स्टे. भिवापूर :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा झिलबोडी येथे दिनांक ०४/०६/२०२३ चे १५.३० वा. १७.३० वा. दरम्यान यातील मृतक नामे– सौ. हिराबाई सिध्दार्थ पाटील वय ४५ वर्ष रा. झिलबोडी ता. भिवापुर ही जेवन करून घरी दिवानवर लेटली असता कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून फिर्यादीचे पत्नीला कुऱ्हाडीचे बुंध्यांने चेहऱ्यावर मारून जिवानिशी ठार केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सिध्दार्थ वकटु पाटील, वय ५२ वर्ष रा. झिलबोडी ता. भिवापुर जिल्हा नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गिरासे पोस्टे भिवापुर मो. नं. ८३५५९५५५३८ हे करीत आहे.

## जबरी चोरी

पो.स्टे. कोंढाळी:– अंतर्गत १/२ कि. मी. अंतरावरील कोंढाळी बस स्टॉप येथे दिनांक ०४/०६/२०२३ चे २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– भुपेन्द्र पुरूशोत्तम खंडवानी, वय ४४ वर्ष रा. गितांजली चौक नागपुर हा उधारीचे पैसे घेवुन बस स्थानकाकडे नागपुर जाण्याकरीता पायदळ जात असता यातील अज्ञात तिन आरोपीपैकी एका आरोपीने फिर्यादिला लाकडी दांडयाने मारून जखमी केले व दुसऱ्या अज्ञात आरोपीने फिर्यादिचे हातात असलेले ७९,०००/–रू असलेली थैली जबरीने हिसकावुन रोडवर मोटरसायकल जवळ असलेला तिसरा आरोपी असे तिन्ही आरोपी मोटरसायकलने पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि पंकज वाघोडे ठाणेदार पोस्टे कोंढाळी मो. नं ७३०४२१०७२४ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक ०४/०६/२०२३ चे सायंकाळी ०६.०० वा. फिर्यादीच्या घराजवळ राहणारा सुभाष वानखेडे यांने आठवडी बाजार कळमेश्वर येथे फिर्यादीचा हात पकडुन ‘‘तु माझ्या सोबत चाल’’ असे म्हणुन फिर्यादीला लज्जा वाटेल या प्रकारचे कृत्य करून फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पाली मो. नं. ९२८४३५४६३० हे करीत आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

## पोलीस स्टेशन देवलापारची कारवाई

दिनांक ०४/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ देवलापार हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, ग्रे रंगाच्या झायलो वाहनामध्ये एक इसम अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने करीत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून दिनांक ०४/०६/२०२३ चे १८.१० वा. १९.०५ वा. सुमारास पोलीस स्टेशन देवलापार येथील मौजा चोरबाहुली शिवार येथे नाकाबंदी करून ग्रे रंगाची झायलो गाडी क्र. एम. एच.— ४३ एक्स— ३१२३ मध्ये पाहणी केली असता त्यात एकुण जनावरे ०७ हे कोंबुन त्याचे मुसके आवळुन त्यांची कोणतीही चारापाण्याची सोय न करता निर्दयतेने वागणुक देवुन कत्तलीकरिता अवैधरीत्या वाहतुक करतांनी मिळुन आल्याने यातील फरार आरोपीचे ताब्यातून जनावरे ०७ किमंती अंदाजे ९५०००/— रू झायलो गाडी किमंती ५०००००/— रू असा एकुण वाहनासह ५९५०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपींविरूद्ध पोलिस स्टेशन देवलापार येथे कलम २७९ भादवि सहकलम ११(१),११(१) (जी)११(१) डी ११(१)(सी) प्राण्यांचा झळ प्र.अधि. सहकलम ५ ए, ९ महा.पभु संरक्षण अधि. सह कलम ११९ मपोका सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनी शरद गायकवाड हे करित आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर